# राशिभविष्य - फेब्रुवारी, २०२२.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

=================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला**

**तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणासही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.**

=================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत हर्षल असून त्याच्यामुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा होण्याची शक्यता आहे. या राशीची लहान मुले तर अतिशय हूड, खोडकर झाली असण्याची शक्यता आहे. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच कौटुंबिक जीवनात सतत. होणारे वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातीळ सुखात काहीही कारणाने बाधा येऊ शकेल. तसेच या राशीच्या काही मंडळींना त्वचारोग, रक्तविकार किंवा मुख दंत रोग अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. त्याशिवाय काळ अपघातकारक आहे. सबब सतत सावधानतेने आचरण करा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. . या राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत मंगळ आणि शुक्र असे दोन ग्रह असून भाग्यस्थानी असलेल्या मंगळामुळे प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. म्हणून शक्यतो प्रवास करू नका. शुक्रामुळे गुरुकृपा, थोरकृपा प्राप्त होईल. सर्व सुख व ऐषाराम मिळेल. क्वचित कोणास कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत रवि, बुध,शनिअसे तीन ग्रह असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात भाग्यस्थानी असलेले मंगळ व शुक्र या राशीच्या दशम

स्थानी मकर राशीत जात आहेत. दशम स्थानी असलेला रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे रवि महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायक होईल. शासकीय नोकरदार मंडळी पैकी काही मंडळींना बढती, पगारवाढ, क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान तर कोणास एखादे उच्च पद मिळणेही शक्य आहे. शनि ग्रह अस्तंगत असला तरी रवि दशम स्थानी असेपर्यंत या शनिमुळे काही अविस्मरणीय घटना घडण्याची शक्यता आहे. बुधामुळे शारीरिक, मानसिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत प्रथमपासून गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह आहेतच. गुरुमुळे इच्छा- आकांक्षा पूर्ण होतील. विवाहेच्छूना विवाहयोग येईल. अनेक मार्गांनी धनलाभ होणे संभवते. वाहन सुख
लाभेल. शिक्षणात प्रगती होईल, नवे मित्र मिळतील. पण नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच कुमार्गी मित्रांमुळे मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे नैराश्य येणे संभवते.

श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना व श्रीहनुमान उपासना मनःशक्ती व मनःशांती देईल.म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी
जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना श्रद्धेने
मनापासून ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:” जातक मंत्राचा, ज्यांचे
जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे
त्यांनी “ओम अग्नये नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू असून तो प्रतिकुल होईल; व त्याच्यामुळे कारण असो वा नसो, सतत अपमान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनात सूडभावना उफाळून येईल. .मनावर संयम राखा. तसेच काही मंडळींना वातविकारांचा आजार

होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत केतु असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर राहील, वैवाहिक जीवनातील सुखात बाधा

येणे संभवते.. या राशीच्या अष्टम स्थानी मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत जात आहेत. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला मंगळ

अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे उष्णताविकारांचे आजार होणे संभवते. त्याशिवाय त्तो वीज व पाणी यांपासून धोका असल्याचे सुचवतो. त्यामुळे विजेची उपकरणे सावधानतेने हाताळा, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा मंगळ या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत गेल्यावर शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात मानहानी, मनस्ताप व अन्य प्रकारचे त्रास सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. तसेच या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत असलेला शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होईल; व त्याच्यामुळे फारसा त्रास न होता अपेक्षित अर्थलाभ होईल. तसेच ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. पण या राशीच्या वृद्‍ध मंडळींना मात्र तो प्रतिकुल होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात येथील शुक्र या राशीच्या भाग्यस्थानी

गेल्यावर मनोनुकुल घटना घडतील. व ऐषाराम लाभेल. या राशीच्या भाग्यस्थानी प्रथमपासून रवि व बुध

हे दोन ग्रह आहेतच. येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या

दशम स्थानी कुंभ राशीत गेल्यावर अनुकुल होईल; व त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात लाभदायक घटना घडतील. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला बुध प्रतिकुल होण्याचीच शक्यता आहे. त्याच्यामुळे नियोजित

कार्यात अडचणी, अडथळे येणे, दिरंगाई होणे संभवते. तसेच अकारण भांडणतंटे होतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह आहेतच. येथील गुरु बौद्‍धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक

होईल. वरिष्ठ तुमच्या कार्यकुशलतेचे कौतुक करतील. काही मंडळींना नवे, आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. पण या राशीच्या दशम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे मनस्थिती अस्थिर, चंचल होईल. तरीही तो मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थांचा व्यापार, व्यवसाय असणारांना लाभदायकच होईल. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत हर्षल असून तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे सांपत्तिक अडचणी, जिवावरचे प्रसंग, बेअब्रूच्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मनःशक्ती व मनःशांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो अनुकुल होईल. त्याच्यामुळे आरोग्य
उत्तम राहील, आचारविचार उत्तम होतील, इतरांना सहकार्य कराल. या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून मंगळ वैवाहिक जीवनातील सुखाचे दृष्टीने प्रतिकुल होईल व शुक्र
सर्वतोपरी अनुकुल होईल. त्यामुळे वैवाहिक जीवनात फारसा मनस्ताप होणार नाही, असे वाटते. उलट शुक्रामुळे सुखसमाधानच लाभेल. येथील मंगळ व शुक्र महिन्याच्या अखेरीस या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत जात आहेत. तेथे प्रथमपासून रवि -बुध - शनि असे तीन ग्रह आहेतच. पैकी बुध ग्रह अनुकुल होईल व रवि - शनि प्रतिकुल होतील. बुधामुळे नियोजित कार्यात यश मिळेल, व सुखसमाधान लाभेल. पण रविमुळे इच्च्छा - आकांक्षा अपूर्ण राहतील व त्यामुळे दुःख, आजार, अपयश, संततिसुखात बाधा येणे संभवते. शनिमुळे या सर्व गोष्टीत भरच पडेल व भावनेच्या भरात भरकटत जाल. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळामुळे अनारोग्य होणे संभवते; तर शुक्रामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा

अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. येथील महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यावेळीही तो प्रतिकुलच होईल. त्यामुळे मानसिक ताण, अनारोग्य, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. या भाग्यस्थानी कुंभ राशीत प्रथमपासून गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह आहेतच. येथील गुरु अनुकुल व उत्कर्षकारक होईल व त्याच्यामुळे सद्गुणांचा विकास होईल. प्रगतीच्या अनुकुल संधी प्राप्त होतील, काही मंडळींना कीर्ति -प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे. तसेच अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. येथील नेपच्यूनही शुभ असून आध्यात्मिक प्रगतीस अनुकुल होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे निश्चित असे काय घडेल ते सांगता येत नाही. पण त्याच्यामुळे मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते. उलट त्याच्यामुळे अर्थलाभ होणेही शक्य दिसते. या राशीच्या व्यय स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळेही अर्थलाभ होईल, काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण वैवाहिक सुखाचे दृष्टीने तो प्रतिकुल होण्याचीच शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर जगदंबा दुर्गा देवीची उपासना अनुकुल होईल आणि मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीदुर्गास्तोत्रा" चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मक्षत्र मृग आहे यांनी "ओम सोम सोमाय नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी " ओम नमः: शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसु आहे त्यांनी " ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार होणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शेक्षणिक प्रगतीत अडथळे, अडचणी येण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे इजा होणे, ताप येणे, काही मंडळींना रक्तविकार, हृदयविकार अशापैकी आजार त्रस्त करतील. तसेच त्याच्यामुळे आर्थिक नुकसान होणे, अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. शुक्रामुळे या राशीच्या ज्यांच्याजवळ कलागुण आहेत अशा मंडळींना आपल्या कलेतील प्रगती दाखविण्यास संधीच

मिळणार नाही. या शुक्रात शुद्ध प्रेमभावना केवळ कामुकता असल्यामुळे मनासारखे न घडल्यास काही मंडळी व्यसनाधीन होणे संभवते. काही मंडळींवर नसते आळ येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हे दोन्ही मंगळ व शुक्र या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत जात आहेत. त्यावेळी मंगळामुळे पतिपत्नीपैकी कोणाच्या आजारपणामुळे, वाद, भांडणे यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. पण शुक्र अनुकुल असल्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात फारशी बाधा येणार नाही असे वाटते. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत प्रथमपासून रवि -बुध -शनि असे तीन ग्रह आहेतच. पैकी रवि ग्रह केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्याचा त्रास, मनाविरुद्ध घटना घडणे, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, संततिसुखात बाधा येणे, अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या अष्टम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह आहेतच. येथील गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल. पण येथील नेपच्यून जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच उघड्यावरचे खाद्यपदार्थ खाऊ नका. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे काही मंडळींना नोकरीत बढती, पगारवाढ असे काही मिळणे संभवते. स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यवसायात लाभ होतील. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना आपल्या संशोधन कार्यात प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या लाभस्थानी राहू असून त्याच्यामुळे संततिविषयक एखादी चिंता त्रस्त करील. तसेच या राशीच्या ज्या मंडळींना नोकरीत अधिकारपद प्राप्त झाले आहे त्यांच्यापैकी काहींना आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा त्रस्त करील. पण त्यांनी तो मोह मनावर ताबा ठेवून कार्यान्वित करू नये. होत्याचे नव्हते होईल. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना मनःशांती व मनःशक्ती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसु आहे त्यांनी "ओम अदितीये नमः" तारक

मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारक होणेही संभवते. या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून मंगळ ग्रहामुळे संततीच्या आचरणविषयक समस्या त्रस्त करतील. काही मंडळींना मुलांचे मनाविरुद्ध वागणे मनस्ताप देईल. तर काही मंडळींना मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची चिंता अस्वस्थ करील. पण शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलात्मक व्यवसाय असणारांना आपल्या कलेत व कलात्मक व्यवसायात प्रगती करणे शक्य होईल. येथील मंगळ शुक्र हे दोन्ही ग्रह महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत जात आहेत. त्यावेळी हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील व मंगळामुळे अनारोग्य, अपप्रचाराचा त्रास व अर्थहानी होण्याची शक्यता दिसते. शुक्रामुळे उच्च कलागुण असूनही ते प्रदर्शित करण्यास संधीच मिळणार नाही. या षष्ठ स्थानी मकर राशीत प्रथमपासून रवि -बुध-शनि हे तीन ग्रह आहेतच. येथील रवि दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होईल, तसेच महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी म्हणजे केंद्रस्थानी जात असल्याने भाग्योदयकारक होईल. बुधामुळे नियोजित कार्यात यश मिळेल, तसेच धनलाभ होईल व काही मंडळींना प्रसिद्धीही मिळू शकेल. शनि दशम स्थानास पूरक होईल. पण त्याच्यामुळे गैरसमजुती, अनारोग्य, भांडणे होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून त्यांच्यामुळे काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल, प्रेमसंबंध असणारांचे संबंध
दृढ होतील. काहींना नवे मित्र मिळतील, प्रवासाचे योग येतील, व काहींना अर्थलाभही होणे शक्य दिसते. पण येथील नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग संभवतात. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकूल होईल व त्याच्यामुळे नोकरीत बढती, अधिकार पद मिळू शकेल. काहींचा सन्मान होणेही संभवते. श्रद्धा असेल तर भगवान विष्णूची उपासना मनःशक्ती व मनःशांती देईल. म्हणून दररोज

सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णु सहस्रनाम स्तोत्रा" चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतु असून तो मनस्तापदायक होण्याची शक्यता आहे. पण या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. ह्या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून मंगळामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. त्यातून कुटुंबात असमाधानकारक घटना घडू शकतील. जपा. पण शुक्रामुळे ज्यांच्याजवळ शेतीवाडी आहे अशांना त्यापासून लाभ होईल. ऐषाराम मिळेल. येथील मंगळ -शुक्र हे दोन्ही ग्रह महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत जात आहेत. त्यावेळी काही मंडळींना संतति समस्या व एखादी असमाधानकारक घटना. त्रस्त करील. पण येथील शुक्र कलात्मक विषयाची आवड असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. पैकी रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. तसेच संततीपैकी कोणाच्या आजारपणाची चिंता त्रस्त करील. नातेसंबंधात दुरावा निर्माण होणे संभवते. हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्या वेळी तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल; हितशत्रू पराभूत होतील, व शांती लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या बुधामुळे संतती,स्त्रीपासून त्रास होणे संभवते. शनिमुळे बुद्धी स्वार्थी, संशयी, व्यवहारी अशी होईल; पण त्याच्यामुळे चिकाटीचा गुण विकसित होईल. . या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह आहेतच. गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील; तर काही मंडळींना नोकरचाकराचे सुख मिळेल. पण येथील नेपच्यूनमुळे काही मंडळींना उगीचच आपल्याला एखादा आजार झाल्याची भावना त्रस्त करील. काही मंडळींना एखादी काल्पनिक चिंता त्रस्त करील. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो अपघातकारक होणार असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू असून

त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर "दुर्गा देवी स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** - या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे अर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व मंगळामुळे धैर्य, हिंमत, महत्वाकांक्षा वाढेल. हातून कर्तृत्व घडेल. पण इजा होणेही संभवते. शुक्रामुळे काही मंडळींना भूमिलाभ प्राप्त होईल. व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. त्याशिवाय काही मंडळींना धनलाभ तर क्वचित कोणास मानाचे स्थान प्राप्त होईल, कोणाची प्रतिष्ठा वाढेल. येथील मंगळ -शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत जात आहेत. त्यावेळी मंगळ प्रतिकुल होईल; पण शुक्र अनुकुलच असेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कार्य दिरंगाई, दुःख, निराशा, कौटुंबिक त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात संततीपैकी कोणाचा आजार, नोकरीत वरिष्ठांचा जाच, नातेसंबंधात दुरावा निर्माण होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या बुधामुळे गृहसौख्य, मित्रसुख मिळेल; पण धननाश होणे संभवते. शनीमुळे गृहसौख्य हानी होण्याची शक्यता आहे. जपा. त्यामुळे नैराश्य येईल. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. येथील गुरु पूर्णपणे अनुकुल होईल व त्याच्यामुळे अर्थलाभ होईल, विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करता येईल. प्रेमसंबंध वाढतील व सर्व सुख मिळेल. मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. गूढ संशोधनात रस असणारांना संशोधन कार्यात प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो वैवाहिक सुखास प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे पतिपत्नीत वाद,भांडणे, होतील, दोघापैकी कोणाचे तरी आचरण लहरी, विक्षिप्त प्रकारचे होईल. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांमध्ये विविध

कारणांनी  भागीदारी तुटण्याची शक्यता दिसते. जपा.  या  राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होईल. काही मंडळींना  वारसा हक्काने धनलाभ होईल. पण वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. श्रद्‌धा असेल  तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना  मनःशक्ती व मनःशांती देईल. म्हणून  दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्‌धेने " शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी  जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय  दररोज सकाळी स्नान करताना  मनापासून श्रद्‌धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे  त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा,  ज्यांचे  जन्मनक्षत्र  स्वाती आहे  त्यांनी "ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा  आणि ज्यांचे  जन्मनक्षत्र विशाखा आहे  त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक  मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशी केतू  असून  तो सर्व प्रकारे  अनुकुल  होईल; पण  त्याच्यामुळे  वाहनधोका  संभवतो.  म्हणून सतत सावधानतेने  आचरण करा.  या राशीच्या धनस्थानी धनु राशीत मंगळ  व  शुक्र  असे दोन ग्रह असून मंगळामुळे आर्थिक चिंता  त्रस्त करतील. शिवाय त्याच्यामुळे उष्णताविकाराचा  एखादा आजार  त्रस्त  करीलसे  दिसते.  पण शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान  लाभेल.  कौटुंबिक  प्रगती होईल. येथील मंगळ -शुक्र  महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत जात आहेत. त्यावेळी हे दोन्ही  ग्रह अनुकुल  होतील व  मंगळामुळे  धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा  वाढेल,  हातून  काही कर्तृत्व घडेल, काही  मंडळींना प्रवास योग येईल, पण त्याच्यामुळे एखादी इजा  होण्याची शक्यता आहे.  शुक्रामुळे  या  राशीच्या  काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना धनलाभ होणे संभवते. क्वचित कोणास मानाचे स्थान तर कोणास प्रतिष्ठा प्राप्त होण्याची शक्यता  आहे.  या  राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह प्रथमपासून  आहेतच. येथील रवि  महिन्याच्या पूर्वार्धात  पूर्णपणे अनुकुल होईल; व त्याच्यामुळे सर्व सुख मिळेल, आरोग्य उत्तम राहील, तुमच्या कार्यकुशलतेवर वरिष्ठ प्रसन्न होतील, क्वचित कोणाचा सन्मान होईल; तर कोणास एखादे उच्च पद मिळण्याची शक्यता  दिसते. हा रवि महिन्याच्या  उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गेल्यावर  प्रतिकुल  होईल. त्यावेळी अनारोग्य होणे , नियोजित कार्यात दिरंगाई  होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, कौटुंबिक त्रास सहन

करावा लागणे, त्यामुळे नैराश्य येणे संभवते. म्हणून जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करा. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत गुरु व नेपच्यून हे दोन ग्रह प्रथमपासून आहेतच. येथील गुरुमुळे कौटुंबिक सुख लाभेल, पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. काही मंडळींची स्थावर खरेदी-विक्रीची कामे होतील. पण नेपच्यूनमुळे घरगुती व्यवहारात गैरसमज, घोटाळे होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत हर्षल असून तो तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल; पण त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना डोकेदुखीचा आजार तर क्वचित कोणास मेंदूविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. काही मंडळींना मुदतीचा ताप येईल. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे काही मंडळींच्या मनात कपटी विचार प्रबळ होतील. काही मंडळींना वाममार्ग धन प्राप्तीची प्रबळ इच्छा अनावर होईल. शिवाय त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेशाची उपासना व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती आणि मनःशांती प्राप्त होईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी " श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून मंगळामुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव हट्टी, मानापमान फार असणारा असा घडला असण्याची शक्यता वाटते. नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. त्यामुळे श्रम, दगदग, थकवा येणे संभवते. पण शुक्रामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळ व शुक्र हे दोन्ही ग्रह या राशीच्या धनस्थानी मकर राशीत जात आहेत. या धनस्थानी प्रथमपासून रवि, बुध व शनि असे तीन ग्रह आहेतच. रविमुळे व उत्तरार्धात मंगळामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. वित्तहानी होण्याची शक्यता दिसते. भांडणतंटे होतील. अनारोग्य

होण्याची शक्यता आहे. विशेष करून उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. काहींना डोळ्याची दुखणी तर काही मंडळींना घसा, मान, दाढा यांचे आजार त्रस्त करतील. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यावेळी तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल, तुमच्या कार्यकुशलतेचे वरिष्ठ कौतुक करतील. काही मंडळींचा सन्मान होण्याची शक्यता दिसते. तसेच क्वचित कोणास एखादे उच्च पदही मिळू शकेल. धनस्थानी असलेल्या बुधामुळे दुःख सहन करावे लागले तरी त्याच्यामुळे धनलाभ होणे संभवते. धनस्थानी असलेल्या शनिमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करतील. महिन्याच्या अखेच्या सप्ताहात या स्थानी आलेल्या शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या तृतीय स्थानी प्रथमपासून गुरु व नेपच्यून हे दोन ग्रह आहेतच. येथील गुरुमुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, व्यावसायिकांच्या व्यवसायात प्रगती होईल व अर्थलाभ होणेही संभवते. पण नेपच्यूनमुळे आर्थिक संकटे येणेही शक्य आहे. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत हर्षल असून तो बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. क्वचित कोणास अंतर्ज्ञान शक्ती प्राप्त होईल. कलाकारांना कलेत प्रगती करता येईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे ज्यांचा इतर जातिधार्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना लाभदायक होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण स्वभाव धूर्त, कावेबाज होण्याची शक्यता दिसते. तसेच काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव लहरी,चंचल होण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:" तारक मंत्राचा; ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल, प्रवासयोग येईल, यश मिळेल. या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळ महिन्याच्या संपूर्ण काळात सर्व प्रकारे प्रतिकुल होणार असून

शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि -बुध - शनि असे तीन ग्रह असून व्ययस्थानी असलेले मंगळ व शुक्र हे दोन्ही ग्रह महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या प्रथम स्थानी जात आहेत. येथील मंगळामुळे स्वभाव संतापी, हट्टी, होईल व अनारोग्य होणे संभवते. रविमुळेही अनारोग्यात भरच पडेल व मनस्ताप सहन करावा लागेल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यावेळीही त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. प्रथम स्थानी असलेल्या बुधामुळे मनस्थिती चंचल होईल, त्यातून मित्रद्रोह होण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना कुसंगतीची बाधा होईल. त्यातून धननाशही होणे शक्य आहे. जपा. येथील शनिमुळे तर अनारोग्याबरोबरच नियोजित कार्यात अडथळे येणे, कुटुंबातील कोणाचे स्थलांतर होणे व त्यामुळे नैराश्य येण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या धनस्थानी प्रथमपासून गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह आहेतच. येथील गुरु अनुकुल होईल व त्याच्यामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील व स्वतंत्र व्यवसाय करत असणारांच्या व्यवसायात प्रगती होईल. पण नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे कशातच सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही व सतत तक्रारी करत राहाल. त्यामुळे कौटुंबिक सुख लाभणार नाही. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो कमिशन,दलालीवर व्यवसाय करत असणारांना लाभदायक होईल. तसेच त्याच्यामुळे काहीही कारणाने संततिसुखात बाधा येणे संभवते.
श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी असलेला रवि या राशीच्या प्रथम स्थानी येत आहे. येथील गुरु अनुकुल होईल व त्याच्यामुळे बौद्धिक संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना आपल्या कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. तसेच आरोग्य उत्तम राहील. पण नेपच्यूनमुळे मनस्थिती अतिशय कोमल होईल, मानसिक संवेदना अति जलद होतील व मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच नैराश्य येईल. महिन्याच्या उत्तरार्धात या स्थानी आलेला रवि अनारोग्यकारक व मनस्तापदायक होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे उच्च बौद्धिक शक्ती, स्मरण शक्ती, आकलन शक्ती व चौकसपणा लाभेल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात त्रास, कटकटी निर्माण होतील, अशुभ घटना घडण्याची शक्यताही दिसते. शिवाय नियोजित कार्यात अपयश येणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि .येईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून आहे तो नोकरीव्यवसायच करावा. या राशीच्या लाभस्थानी धनु राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून येथील मंगळामुळे कष्ट, परिश्रम करूनच अर्थप्राप्ती होईल. शिवाय त्याच्यामुळे मैत्रीत वितुष्ट येणे संभवते. पण त्याच्यामुळे काही मंडळींना मूल्यवान वस्तूंची प्राप्ती होणेही संभवते. शुक्रामुळे धनलाभ होणे, ऐषाराम मिळणे संभवते. सर्व सुख प्राप्त होईल.. येथील शुक्र व मंगळ महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर मंगळ पूर्णपणे अशुभ होईल. पण शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या व्ययस्थानी प्रथमपासून रवि -बुध - शनि असे तीन ग्रह आहेतच. पैकी रविमुळे शरीरपीडा होईल, मानभंग होणेही संभवते, व सतत प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागेल. बुधामुळे अनारोग्य, मानहानी आणि अपयश येणे संभवते. शनिमुळे संकटपरंपरा निर्माण होईल. म्हणून आर्थिक व्यवहार सावधानतेने व काळजीपूर्वक करा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमंताची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून

श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी " ओम वरुणाय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या व्यय स्थानी मीन राशीत गुरु व नेपच्यून असे दोन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी असलेला रवि व्ययस्थानी येत आहे. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह व्ययस्थानी आल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व त्यामुळे शरीरपीडा होणे, मानभंग होणे संभवते. गुरुमुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. तसेच समाजसेवेची आवड असणारांना तो अनुकुल होईल. येथील नेपच्यूनमुळे कसली चिंता मनस्ताप देईल, त्यामुळे नैराश्य येणे संभवते. पण हा नेपच्यून गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे मनस्थिती अति अस्थिर होणे संभवते. विचित्र आचरण होण्याचीही शक्यता आहे. आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होणेही संभवते. त्याशिवाय अविचाराने नको तो खर्च होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल, मन हरहुन्नरी होईल, हातून कर्तृत्व घडेल, पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत केतू असून त्याच्यामुळे ढोंगी, धूर्त आचरण होण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत मंगळ व शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व मंगळामुळे काही मंडळींच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील, नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल, काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण हा मंगळ औषधविक्रेते व यांत्रिकतांत्रिक नोकरीव्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. येथील शुक्रामुळे अडचणी, अडथळे व दुःख सहन करावे लागेल. या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत रवि -बुध -शनि असे तीन ग्रह असून रवि महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य चांगले राहील, अर्थलाभ होणेही संभवते. बुधामुळे सुखसमाधान,अर्थलाभ व मित्रलाभ होईल. शनि सुद्धा साधारण शुभच असेल; पण त्याच्यामुळे संततीपैकी कोणास कसला तरी त्रास होण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात दशम स्थानी असलेले मंगळ व शुक्र या लाभस्थानी येत आहेत. त्यावेळी मात्र कष्ट-परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. तसेच मित्रांशी वितुष्ट येऊ

**शकेल. पण या राशीच्या काही मंडळींना एखादी मौल्यवान वस्तू मिळणेही संभवते. पण शुक्र सर्व प्रकारे अनुकुल होणार असल्याने मंगळाचा त्रास होणारच नाही. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अहिर्बुध्न्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी "ओम पूषाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.**

=====ooooo0ooooo=====